**परिपत्रक क्र. ४१**

**इ. ५ वी ते इ.१० वी प्रथम सत्र परीक्षा सन २०१८-२०१९ : परीक्षा संचालनाबाबत मार्गदर्शक सूचना.**

# रयत शिक्षण संस्था, सातारा

कर्मवीर समाधी परिसर,सातारा

**माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग**

**परिपत्रक क्र. ४१ दिनांक. ०२/ १०/२०१८**

**योग्य त्या कार्यवाहीसाठी**

सर्व मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था.

यांना ----

विषय- **प्रथम सत्र परीक्षा सन २०१८-१९**

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांनी **इ. ५ वी ते १० वी प्रथम सत्र परीक्षा दिनांक २३/१०/२०१८ ते ०२/११/२०१८ या कालावधीत सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार घ्यावी.** कोणत्याही परिस्थितीत वेळापत्रकानुसार ज्या दिवशीचा पेपर त्या दिवशीच होईल हे कटाक्षाने पहावे. सदर परीक्षा संचालनासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) बैठक व्यवस्था :-

विद्यालयात उपलब्ध असलेल्या वर्ग खोल्यांचा पर्याप्त वापर सकाळ व दुपारच्या पेपरसाठी करावा. सकाळच्या पेपरसाठी इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची व दुपारच्या पेपरसाठी इ. ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांची सरमिसळ करुन बैठक व्यवस्था करावी. एकदा केलेली बैठक व्यवस्था सर्व विषयांसाठी समान ठेवावी.

२) कॉपी प्रतिबंध :-

सदर परीक्षा कॉपी मुक्त राहील याची खबरदारी संबंधीत परीक्षाप्रमुख, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक यांनी घ्यावयाची आहे.

३) उत्तरपत्रिका तपासणी व निकाल पत्रक तयार करणे :-

उत्तरपत्रिका तपासणी काम काळजीपूर्वक करणे विषयी शिक्षकांना सूचना द्याव्यात. मुख्याध्यापकांनी तपासणीचे काम अचूक होण्यासाठी योग्य सूचना संबंधितांना द्याव्यात.उत्तरपत्रिकांचे नियमन महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या नियमानुसार काटेकोरपणे करुन, त्याची नोंद आपल्या दप्तरी ठेवावी.

४) प्रश्नपत्रिका ताब्यात घेणे :-

सत्र -१ च्या प्रश्नपत्रिका या **प्रेसकडून छापून गटशाखेत दि. १९/१०/२०१८ अखेर** पोहोच केल्या जातील. गटातील शाखांनी गट शाखेकडून दि.२०/१०/२०१८ पर्यत प्रश्नपत्रिका घेवून जाव्यात. इयत्तानिहाय पुरेशा प्रश्नपत्रिका मिळाल्याची (सेमी.इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिकांसह) खात्री करावी. (गठ्ठयावर प्रश्नपत्रिका संख्या लिहिली आहे. ) मागणीपेक्षा प्रश्नपत्रिका कमी असल्याचे आढळल्यास विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून आवश्यक तेवढया प्रश्नपत्रिका मिळवाव्यात.

५) वेळापत्रकातील विषयांखेरीज अन्य विषयांची परीक्षा :-

ऐच्छिक विषयांच्या परीक्षा संबंधित शाखांनी आपल्या स्तरावर वेळापत्रकातील दिवस सोडून अन्य दिवशी सोयीनुसार घ्याव्यात. तथापि सदर परीक्षा दिवाळी सुट्टी सुरु होण्यापूर्वी संपतील असे पहावे.

६) को-या उत्तरपत्रिका :-

शाखांच्या मागणीनुसार को-या उत्तरपत्रिका शाखांकडे परीक्षेपूर्वी पोहोच केल्या जातील. त्यानुसार गट शाखांशी संपर्क साधून त्या ताब्यात घ्याव्यात.

७)   इ.५ वी ते १० वीच्या परीक्षेमध्ये झालेल्या बदलाबाबतच्या सूचना :-

**अ)**   इ.९ वी व १० वीच्या सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिका हया नवीन मूल्यमापन पध्दतीनुसार काढलेल्या आहेत.

**ब )**   सद्यस्थितीमध्ये आपणास सूचित करणेत येते की, आपण अभ्यासक्रम पूर्तता व मूल्यमापनासाठी शासकीय निर्णयानुसार दर्शविलेले बदल यांचा समर्पक अभ्यास करुन, त्यानुसार योग्य कार्यवाही करावी व त्रुटी टाळणेसाठी शासकीय यंत्रणेमार्फत येणारी परिपत्रके व शिक्षण संक्रमण अंक यांच्या आधारे सर्व विषयांच्या अभ्यासक्रम व मूल्यमापन योजना लागू कराव्यात व झालेला बदल संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

**<u>अत्यंत महत्त्वाचे</u> :-**

१)   सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

२)   आपल्या शाखेतील सर्व सेवकांची बैठक घेऊन विषय, अभ्यासक्रम, गुण- याबाबत चर्चा करावी. त्यामधील त्रुटी कार्यालयास कळवाव्यात.

( श्री.विलासराव महाडीक )
**सहसचिव (माध्य.),**
**रयत शिक्षण संस्था,सातारा.**

सोबत : परीक्षा वेळापत्रक प्रत-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

१   सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था.
(टीप :- सदरचे परिपत्रक संस्थेच्या वेबसाईटवर पहावयास मिळेल. याची नोंद घेवून आपण आपल्या विभागातील गटप्रमुख शाखेला याबाबत कल्पना देवून माध्यमिक विद्यालयांनी संस्थेच्या वेबसाईटवरुन सदरच्या परिपत्रकाच्या प्रिंटेड कॉपी काढून घेण्याबाबत सूचना द्याव्यात.)

२.   व्यवस्थापक, रयत प्रिंटिंग प्रेस, सातारा.

३.   व्यवस्थापक, रयत प्रिंटिंग प्रेस, अहमदनगर.

४.   विभाग प्रमुख, अकौट विभाग, कार्यालय, रयत शिक्षण संस्था,सातारा.

५.   मुख्याध्यापक (गटप्रमुख शाखा) यांना -
आपण वरील सूचनेप्रमाणे प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका संबंधित शाखांना वेळेत देण्याची व्यवस्था करावी.

# <u>रयत शिक्षण संस्था,सातारा.</u>

## सत्र परीक्षा पहिली (२०१८-२०१९)

## <u>वेळापत्रक</u>

### इयत्ता ५ वी ते १० वी अखेर

| अ.नं. | वार | दिनांक | विषय | इयत्ता | वेळ | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंगळवार | २३/१०/२०१८ | मराठी | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | | ९ वी व १० वी | दुपारी २-३० ते ५-३० | १०० |
| २. | बुधवार | २४/१०/२०१८ | हिंदी | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | हिंदी | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | हिंदी / संस्कृत | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | हिंदी / संस्कृत | ९ वी व १० वी | दुपारी २-३० ते ५-३० | १०० |
| ३. | गुरुवार | २५/१०/२०१८ | इंग्रजी | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | | ९ वी व १० वी | दुपारी २-३० ते ५-३० | १०० |
| ४. | शुक्रवार | २६/१०/२०१८ | परिसर अभ्यास | ५ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | सामान्यविज्ञान | ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | सामान्यविज्ञान | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | सामान्यविज्ञान | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | विज्ञान व तंत्रज्ञान पेपर-१ | ९ वी व १० वी | दुपारी २-३० ते ४-३० | ४० |
| ५. | शनिवार | २७/१०/२०१८ | इतिहास+ ना.शास्त्र | ६ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २० |
| | | | इतिहास+ ना.शास्त्र | ७ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २५ |
| | | | इतिहास+ ना.शास्त्र | ८ वी | दुपारी १-०० ते २-०० | २५ |
| | | | इतिहास+ राज्यशास्त्र | ९ वी व १० वी | दुपारी १-०० ते ३-३० | ६० |
| ६. | सोमवार | २९/१०/२०१८ | गणित | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | गणित | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | गणित | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | गणित भाग-१ | ९ वी व १० वी | दुपारी २-३० ते ४-३० | ४० |
| ७. | मंगळवार | ३०/१०/२०१८ | भूगोल | ६ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २० |
| | | | भूगोल | ७ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २५ |
| | | | भूगोल | ८ वी | दुपारी १-०० ते २-०० | २५ |
| | | | भूगोल | ९ वी व १० वी | दुपारी १-०० ते ३-०० | ४० |
| ८. | बुधवार | ३१/१०/२०१८ | संस्कृत(संयुक्त) | ८ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २५ |
| | | | हिंदी (संयुक्त) | ८ वी | दुपारी २-३० ते ३-३० | २५ |
| | | | संस्कृत(संयुक्त) | ९ वी व १० वी | सकाळी ११-०० ते १-०० | ५० |
| | | | हिंदी (संयुक्त) | ९ वी व १० वी | दुपारी २-३० ते ४-३० | ५० |
| ९. | गुरुवार | ०१/११/२०१८ | गणित भाग-२ | ९ वी व १० वी | सकाळी ११-०० ते ०१-०० | ४० |
| १०. | शुक्रवार | ०२/११/२०१८ | विज्ञान व तंत्रज्ञान पेपर-२ | ९ वी व १० वी | सकाळी ११-०० ते ०१-०० | ४० |

सहसचिव (माध्य.)
रयत शिक्षण संस्था, सातारा